**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सौरप्र-२०१९/प्र.क्र.१५९/ऊर्जा-७.**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ११ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १. शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१८/प्र.क्र.४०१/ऊर्जा-७, दि. १५.११.२०१८.

२. शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१८/प्र.क्र.४०१८/ऊर्जा-७, दि. ०१.०१.२०१९.

३. शासन शुध्दीपत्रक क्र. सौरप्र-२०१८/प्र.क्र.४०१/ऊर्जा-७, दि. ३१.०१.२०१९.

४. शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१८/प्र.क्र.२६/ऊर्जा-७, दि. ०६.०२.२०१९.

५. शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१८/प्र.क्र.२७/ऊर्जा-७, दि. ०६.०२.२०१९.

**प्रस्तावना :-**

राज्यात अटल सौर कृषीपंप योजना राबविण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयासमवेत राज्य शासनाद्वारे राज्यात १ लक्ष सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतूद व अनुसूचित जाती / जमाती लाभार्थ्यांकरीता विशेष घटक योजना/ आदिवासी उपयोजनांतर्गत निधीचा वापर करुन नवीन सौर कृषीपंप योजना तयार करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाची पारंपारिक पध्दतीने कृषीपंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चाच्या बचतीचे / अनुदान व क्रॉस सबसिडी मधील बचतीचे उद्दिष्ट साध्य व्हावे, याकरीता राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहीत १ लक्ष सौर कृषीपंप तीन टप्प्यात उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास दि.१६ ऑक्टोबर, २०१८ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मंत्रीमंडळाने मान्यता दिली. त्यानुसार दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यात “मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना” लागू करण्यात आली.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात २५००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे. या योजनेस शेतकऱ्यांकडून मिळणारा प्रतिसाद बघता व सौर कृषीपंप यांचा शेतकरी, शासन व महावितरण या सर्वांना होणारा उपयोग लक्षात घेता मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना सन २०१९-२० मध्ये सदर योजनेचे उर्वरीत दुसरा व तिसरा टप्पा एकत्रित राबविण्यास परवानगी देणेबाबत महावितरण कंपनीने शासनास विनंती केली होती. तसेच शेतकऱ्यांची निकड व आवश्यकता विचारात घेता या योजनेंतर्गत ३ अश्वशक्ती व ५ अश्वशक्ती सौर कृषी पंपाबरोबरच ७.५ अश्वशक्तीचे सौर कृषीपंप देण्यास आणि असे सर्व सौर कृषीपंप हे डी.सी. प्रकारचे असावेत, अशी महावितरण कंपनीने शासनास विनंती केली होती. सदर योजनेंतर्गत योजनेची अंमलबजावणी सुलभरित्या होण्याच्या दृष्टीने सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे. सुकाणू समितीची दि.१२ जून, २०१९ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत चर्चेअंती समितीने एसी प्रकारचे सौर कृषीपंपांबाबत शेतकऱ्यांच्या अडचणी व मागणी विचारात घेऊन सदर योजनेच्या

पुढील टप्प्यात केवळ डी.सी. प्रकारचे सौर कृषीपंपांचे वाटप करावे, ३ अश्वशक्ती डी.सी. व ५ अश्वशक्ती डी.सी. सौर कृषी पंपाबरोबरच ७.५ अश्वशक्ती डी.सी. चे सौर कृषी पंप (एकूण संख्येच्या १०%) शेतकऱ्यांना देण्यास मान्यता देऊन महावितरणने त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला. महावितरण कंपनीने त्यानुसार सादर केलेल्या "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना टप्पा-२ व ३" अंतर्गत ७५००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शेतकऱ्याला दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाची पारंपारिक पध्दतीने कृषीपंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चात व राज्य शासनाव्दारे सबसीडीपोटी देण्यात येणाऱ्या अनुदानात बचतीचे उद्दिष्ट साध्य व्हावे याकरीता राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी सुरु करण्यात आलेल्या "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना " अंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षात ७५००० नग सौर कृषीपंप आस्थापित करण्याच्या "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना टप्पा-२ व ३" योजनेच्या अंमलबजावणीस व एकूण रुपये १५३१.०७०५ कोटी रकमेच्या प्रकल्प खर्चास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

"मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना टप्पा-२ व ३" ही पूर्णत: राज्य शासनाची योजना राहील व सदर योजना प्रत्यक्ष सुरु झाल्यापासून १८ महिन्यात राबविण्यात येईल.

२. <u>उद्दिष्टाचे अश्वशक्ती, प्रकार निहाय निश्चिती व वर्गवारी निहाय वाटप:-</u>

सौर कृषीपंपाच्या योजनांचा सर्वसाधारणपणे मागील पूर्वानुभव, अपेक्षित मागणी, भौगोलीक परिस्थिती व किंमतीचा विचार करून सन २०१९-२० करीता असणाऱ्या ७५,००० इतक्या सौर कृषी पंपापैकी ७० टक्के पंप हे ३ अश्वशक्ती डी.सी. क्षमतेचे, २० टक्के पंप हे ५ अश्वशक्ती डी.सी. क्षमतेचे व १० टक्के पंप हे ७.५ अश्वशक्ती डी.सी. क्षमतेचे असतील. त्यानुसार ३ अश्वशक्ती डी.सी. चे ५२,५०० नग, ५ अश्वशक्ती डी.सी. चे १५,००० नग इतके तसेच ७.५ अश्वशक्ती डी.सी. चे ७,५०० नग असे एकूण ७५,००० सौर कृषीपंपाच्या उद्दिष्टाचे वर्गीकरण आहे. सदर योजनेत डी.सी. पंपाची कार्यक्षमता व शेतकऱ्यांकडून डी.सी. पंपांबाबत होत असलेली मागणी विचारात घेऊन फक्त डी.सी. प्रकाराचे सौर कृषि पंपांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सन २०१७-१८ मधील अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची लोकसंख्या व सर्वसाधारण लोकसंख्या विचारात घेऊन सन २०१९-२० या आर्थिक वर्षात ७५००० नग सौर कृषीपंपांच्या उद्दिष्टांची लाभार्थी वर्गवारी निहाय विभागणी व त्याकरिता लागणारा निधी याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अश्वशक्ती DC पंप | निविदा किंमत (रु.) | वर्गवारी | पंप संख्या | लाभार्थी हिस्सा (रु.कोटी) | शासन हिस्सा (रु.कोटी) | उर्वरित हिस्सा (रु.कोटी) | एकूण (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ HP अमरावती (१५%) | १,६५,४३३ | सर्वसाधारण | ६२०९ | १०.२७२ | १०.२७२ | ८२.१७३८ | १०२.७१७८ |
| | | अनु. जाती | ९३० | ०.७६९ | १४.६१६ | ०.००० | १५.३८५० |
| | | अनु. जमाती | ७३६ | ०.६०९ | ११.५६७ | ०.००० | १२.१७६० |
| ३ HP अमरावती वगळून (८५%) | १,५८,८३५ | सर्वसाधारण | ३५१८७ | ५५.८८९ | ५५.८८९ | ४४७.११४० | ५५८.८९२० |
| | | अनु. जाती | ५२७० | ४.१८५ | ७९.५२१ | ०.००० | ८३.७०६० |
| | | अनु. जमाती | ४१६८ | ३.३१ | ६२.८९२ | ०.००० | ६६.२०२० |
| ५ HP कोकण वगळून (९५%) | २,३१,१९४ | सर्वसाधारण | ११२३६ | २५.९७७ | २५.९७७ | २०७.८१६ | २५९.७७०० |
| | | अनु. जाती | १६८४ | १.९४७ | ३६.९८६ | ०.००० | ३८.९३३० |
| | | अनु. जमाती | १३३० | १.५३७ | २९.२११ | ०.००० | ३०.७४८० |
| ५ HP कोकण (५%) | २,३३,५९० | सर्वसाधारण | ५९२ | १.३८३ | १.३८३ | ११.०६२८ | १३.८२८८ |
| | | अनु. जाती | ८८ | ०.१०३ | १.९५३ | ०.००० | २.०५६० |
| | | अनु. जमाती | ७० | ०.०८२ | १.५५३ | ०.००० | १.६३५० |
| ७.५ HP | ४,२०,००० | सर्वसाधारण | ५९१४ | २४.८३९ | २४.८३९ | १९८.७१० | २४८.३८०८ |
| | | अनु. जाती | ८८६ | १.८६१ | ३५.३५१ | ०.००० | ३७.२१२० |
| | | अनु. जमाती | ७०० | १.४७ | २७.९३ | ०.००० | २९.४००० |
| एकूण | | सर्वसाधारण | ५९१३८ | ११८.३६ | ११८.३६ | ९४६.८७६६ | ११८३.५९६६ |
| | | अनु. जाती | ८८५८ | ८.८६५ | १६८.४२७ | ०.०००० | १७७.२९२० |
| | | अनु. जमाती | ७००४ | ७.००८ | १३३.१५३ | ०.०००० | १४०.१६१० |
| | | एकूण | **७५०००** | **१३४.२३३** | **४१९.९४** | **९४६.८७६६** | **१५०१.०४९६** |
| प्रशासकीय खर्च | | | | | | **३०.०२०९** | **३०.०२०९** |
| **एकूण** | | | | | | **९७६.८९७५** | **१५३१.०७०५** |

वरील उद्दिष्टांचे जिल्हानिहाय वाटपाचे अधिकार राज्यस्तरीय सुकाणू समितीकडे राहतील, जेणेकरून सदर वाटपावर आवश्यकता व मागणीनुसार संनियंत्रण ठेवणे सुलभ होईल.

३. **लाभार्थी हिस्सा :-**

या योजनेंतर्गत सर्वसाधारण लाभार्थ्यांकरीता सौर कृषीपंपाच्या निविदा किमतीच्या १० टक्के, अनुसूचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांचा ५ टक्के हिस्सा राहील.

४. **योजनेसाठी लागणारा निधी व निधीचा स्रोत:-**

**राज्यशासनाचा हिस्सा:-**

राज्यशासनाचा सर्वसाधारण अर्जदारांसाठीचा हिस्सा रू.११८.३६ कोटी व अनुसूचित जातीच्या अर्जदारांसाठीचा राज्य शासनाचा एकूण हिस्सा रू.१६८.४२७ कोटी आणि अनुसूचित जमातीच्या अर्जदारांसाठी राज्य शासनाचा एकूण हिस्सा रू.१३३.१५३ कोटी इतका राहील.

सर्वसाधारण गटाच्या अर्जदारांकरीता देण्यात येणारा १० टक्के राज्य शासन हिस्सा रु.११८.३६ कोटी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पिय अनुदानातून देण्यात येईल. सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रुपये १०० कोटी तरतूदीमधून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल व उर्वरित तरतूद सन २०२०-२१ च्या नियतव्यातून अर्थसंकल्पित करुन उपलब्ध करुन देण्यात येईल.

विशेष घटक योजनेंतर्गत ५ टक्के लाभार्थी हिस्सा वगळता उर्वरित एकूण ९५ टक्के हिस्सा संबधीत विभागाच्या विना अर्थसंकल्पित नियतव्ययातून अथवा अर्थसंकल्पित तरतूदीमधून पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन द्यावयाचा असल्याने सामाजिक न्याय व विशेष कल्याण विभागाने अनुसूचित जातीच्या अर्जदारांसाठीचा राज्य शासनाचा एकूण हिस्सा रू.१६८.४२७ कोटी

पैकी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीमधून आवश्यकतेनुसार पुनर्विनियोजनाने अथवा विना अर्थसंकल्पित नियतव्यय पुरवाणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करुन देण्यात यावा. तसेच उर्वरित आवश्यक निधी सन २०२०-२१ च्या नियतव्यातून अर्थसंकल्पित करुन उपलब्ध करुन देण्यात यावा.

आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के लाभार्थी हिस्सा वगळता उर्वरित एकूण ९५ टक्के हिस्सा संबधीत विभागाच्या विना अर्थसंकल्पित नियतव्ययातून उपलब्ध करुन द्यावयाचा असल्याने आदिवासी विकास विभागने अनुसूचित जमातीच्या अर्जदारांसाठी राज्य शासनाचा एकूण हिस्सा रू.१३३.१५३ कोटी पैकी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीमधून आवश्यकतेनुसार पुनर्विनियोजनाने अथवा विना अर्थसंकल्पित नियतव्यय पुरवाणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करुन देण्यात यावा. तसेच उर्वरित आवश्यक निधी सन २०२०-२१ च्या नियतव्यातून अर्थसंकल्पित करुन उपलब्ध करुन देण्यात यावा.

<u>अतिरिक्त वीज विक्रीकर वसुली</u>

योजनेच्या टप्पा-२ व ३ च्या अंमलबजावणीकरिता लागणारा अतिरिक्त निधी उपलब्ध करण्यासाठी दि.२६ डिसेंबर, २०१८ च्या अधिसूचनेनुसार दिनांक ०१.०१.२०१९ पासून शहरी व ग्रामीण भागातील औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांकडून महाराष्ट्र वीजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ अंतर्गत सद्य:स्थितीत आकारण्यात येणाऱ्या वीजविक्री करात १० पैशांनी वाढ करुन अतिरिक्त वीज विक्रीकर आकारण्याबाबत घेण्यात आलेल्या मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार आकारण्यात येईल. असा अतिरिक्त वीज विक्री कराव्दारे जमा होणारा निधी हा महावितरणकडील एस्क्रो खात्यात परस्पर जमा करण्यात यावा. असा अतिरिक्त वाढीव वीज विक्रीवरील कर हा योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या कालावधी पुरता मर्यादित राहील. यात जमा होणाऱ्या रकमेचा तपशील विद्युत निरीक्षक यांनी दर महिन्यास शासनास सादर करावा. सदर निधीतून महावितरणसाठी रक्कम आहरित करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेण्यात यावी.

<u>योजनेचा प्रशासकीय खर्च</u>

शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०१९ अन्वये योजनेची प्रसिध्दी करणे, समन्वय साधने व प्रशासकीय खर्चासाठी महावितरण कंपनीला प्रकल्प खर्चाच्या २ टक्के निधी देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आताच्या टप्पा-२ व ३ साठी २ टक्के निधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर रक्कम रुपये ३०.०२०९ कोटी इतकी येत असून ती प्रकल्प खर्चात समाविष्ट करुन येणाऱ्या एकूण रुपये १५३१.०७०५ कोटी रकमेच्या प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

५. <u>लाभार्थी निवडीचे निकष:-</u>

१) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध आहे, असे सर्व शेतकरी पात्र राहतील. मात्र अशा शेतकऱ्यांकडे पारंपारिक पध्दतीने विद्युत जोडणी झालेली नसणे आवश्यक आहे.

२) ५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमते पर्यंतचे सौर कृषी पंप व ५ एकरापेक्षा जास्त शेतजमीन धारक शेतकऱ्यास ५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देय

राहील. ५ एकर क्षेत्रापेक्षा जास्त शेतजमीन धारण करणाऱ्या लाभार्थ्यास भौगोलिक परिस्थितीनुसार पंपासाठीची मागणी विचारात घेऊन ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषीपंप देय राहील.

३) राज्यातील पारंपरिक ऊर्जेव्दारे विद्युतीकरण न झालेले शेतकरी,विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेले शेतकरी, महावितरण कंपनीकडे विद्युत जोडणीसाठी पैसे भरूनही प्रलंबित असणाऱ्या ग्राहकांपैकी/शेतकऱ्यांपैकी, ज्यांना नजीकच्या काळात विद्युत जोडणी मिळणे शक्य नाही असे शेतकरी, अतिदुर्गम भागतील शेतकरी, महाराष्ट्र शासनाच्या धडक सिंचन योजने अंतर्गत लाभ घेतलेले शेतकरी यांना सदर योजने अंतर्गत प्राधान्य राहील.

४) वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहिर, बोअरवेल, बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरी सुध्दा या योजनेसाठी पात्र राहतील.

५) शेतकऱ्यांकडील बोअरवेल, विहिर व नदी इ.ठिकाणी शाश्वत पाण्याचा स्त्रोत उपलब्ध आहे, याची खात्री महावितरण कंपनीद्वारा निश्चित केलेल्या सक्षम प्राधिका याकडून-करण्यात येईल.

६) सदर योजनेंतर्गत सौर कृषी पंप संच किंमतीच्या सर्वसाधारण गटाच्या लाभार्थ्यांने १० टक्के व अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांने ५ टक्के लाभार्थी हिस्सा म्हणून भरणे आवश्यक राहील.

६. <u>योजनेच्या अंमलबजावणीकरीता निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणा:-</u>

सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी विहित कालावधीत करण्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण कंपनीची राहील.

७. <u>योजनेच्या अंमलबजावणीसाठी व संनियंत्रणासाठी राज्यस्तरीय सुकाणू (Steering Committee) समिती-:</u>

सदर योजना महावितरण कंपनीद्वारे राबविण्यात येत असली तरी या योजनेच्या अंमलबजावणीतील अडीअडचणी, आवश्यकतेनुसार योजनेत बदल व त्या वर्षाच्या योजनेच्या प्रगतीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पित नियतव्ययाच्या मर्यादेत निधी उपलब्धता करण्याकरीता राज्यस्तरावर राज्यस्तरीय सुकाणू समिती (Steering Committee) स्थापन करण्यात येत आहे. त्या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

| | |
|---|---|
| प्रधान सचिव (ऊर्जा) | अध्यक्ष |
| प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कपंनी मर्यादित | सदस्य सचिव |
| महासंचालक, महाऊर्जा | सदस्य |
| संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |

८. **<u>उपरोक्त समितीचे अधिकार खालीलप्रमाणे असतील :-</u>**

अ) योजनेच्या निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार योजनेची अंमलबजावणी करणे व त्यात आवश्यकता पाहून योग्य ते बदल करणे,

आ) योजना राबवितांना येणाऱ्या अडचणी दूर करणे,

इ) महावितरण कंपनीने मागणी केलेल्या निधीच्या अनुषंगाने त्या वर्षाच्या योजनेच्या प्रगतीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पित नियतव्ययाच्या मर्यादेत निधी उपलब्ध करणे,

ई) गुणवता आश्वासन (Quality Assurance),

उ) योजनेचे काम वेळेत पूर्ण करण्याबाबत योजनेच्या कामावर नियंत्रण ठेवणे,

ऊ) सौर पंपाचे जिल्हा निहाय उद्दिष्टे ठरविणे / वाटप करणे वा आवश्यतेनुसार त्यात बदल करणे

ऋ) अध्यक्षांच्या संमतीने इतर अधिकारी/ संस्था आमंत्रीत करणे

**<u>.९या योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती राहील-:</u>**

१) राज्यात सदर योजना महावितरण कंपनीकडून प्रामुख्याने जिल्हाधिकारी, महाऊर्जा, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, जिल्हा कृषी अधिकारी इ. यांच्या समन्वयाने राबविण्यात येईल.

२) या योजनेची प्रसिध्दी महावितरण कंपनीद्वारे करण्यात येईल. योजनेची प्रसिध्दी व समन्वय साधण्यासाठी येणारा प्रशासकीय खर्च एकूण निधीच्या २ टक्के राहील.

३) योजनेची अंमलबजावणी करतांना लाभार्थ्यांकडे शाश्वत पाण्याचा स्रोत उपलब्ध करण्याची जबाबदारी महावितरण कंपनीव्दारा निश्चित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून खात्री करून घेण्यात यावी. सदर योजनेत लाभार्थी निवडीची प्रक्रिया कमी अवधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीव्दारा ऑनलाईन तयार करण्यात आलेल्या पोर्टलचा वापर करण्यात येईल, ज्यामध्ये अर्जदाराला विहित नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा असेल. अर्जदाराचे स्थळ परीक्षण महावितरण कंपनीव्दारा करण्यात येऊन लाभार्थी निवडीच्या निकषानुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

४) राज्य शासनाद्वारे सुरु करण्यात आलेल्या एचव्हीडीएस योजनेंतर्गत जेथे वीज पुरवठा करण्याकरिता पायाभूत खर्च हा रु. २.५ लक्ष पेक्षा जास्त आहे तेथे वीज ग्राहकांस सौर कृषी पंप देण्याची बाब विचाराधीन आहे. या योजने अंतर्गत लागणाऱ्या सौर कृषी पंपाकरीता खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे महावितरणकडून करण्याचे नियोजित आहे. लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या नगांकरीता कार्यादेशही महावितरणतर्फे पुरवठादारास देण्यात येतील.

५) नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सौर कृषीपंपाचे तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) बनविण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील. तसेच योजनेच्या गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी देखील महावितरण कंपनीचीच राहील.

६) महावितरण कंपनीद्वारा निश्चित तांत्रिक मानदंडानुसार सोलार मोडयुल्स हे भारतीय बनावटीचे व आय.ई.सी. (IEC) प्रमाणित किंवा तत्सम राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार प्रमाणित असावेत. याबाबत महावितरण कंपनीद्वारा साहित्य पुरवठादार कंपनीमध्ये साहित्याची तांत्रिक मानदंडानुसार पाहणी करून साहित्यांच्या योग्यतेबाबत खात्री करेल.

७) सौर कृषीपंपाचा हमी कालावधी हा ५ वर्षांचा असणे व सोलार मोडयुल्सची वॉरंटी १० वर्षांची असणे आवश्यक आहे, यासाठी आवश्यक अटींची कंत्राटामध्ये समावेश करण्यात येईल तसेच सौर कृषी पंपासाठी पुरवठादाराकडून ५ वर्षांसाठीचा सर्वंकष देखभाल व दुरुस्ती करार (रु.१००/- च्या स्टँम्स पेपरवर) महावितरणकडून करण्यात येईल. हमी कालावधीत सुरक्षा अनामत/ बँक गॅरंटी महावितरणकडे असल्याने प्रत्येक सेवा पुरविली नाही तर ती रक्कम अशा रकमेतून वसूल करण्यात येईल. तसेच प्रत्येक जिल्हयात दुरुस्ती केंद्र उभारणे व तक्रार नोंदणीसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

८) सौर कृषीपंप आस्थापित झाल्यानंतर तो संबंधित लाभार्थ्यांस हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर त्याची दैनंदिन सुरक्षितता करण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थीची राहील.

९) सौर कृषीपंप आस्थापित झाल्यानंतर त्याची आस्थापना (Installation)व कार्यान्वित अहवाल (CommissioningReport) अधिक्षक अभियंता, महावितरण यांच्याकडून महावितरण कार्यालयाच्या मुख्यालयास सादर करण्यात येईल.

१०) वित्तीय सहाय्याच्या रकमेची मागणी करून सदर निधी प्राप्त करून घेण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची असेल.

११) आस्थापित करण्यात आलेल्या सौर कृषी पंपाची तांत्रिक तपासणी महावितरण कंपनीमार्फत करण्यात येईल.

१२) योजनेची अंमलबजावणी करतांना त्यासाठी आवश्यक असणारे अर्जाचे विहित नमुने, आस्थापना अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व अनुषंगिक बाबी व तांत्रिक तपासणी नमुना इ. महाविरण कंपनीमार्फत निर्गमित करण्यात येतील.

१३) सदर योजनेचे आवश्यक लेखे महावितरण कंपनीमार्फत ठेवण्यात येतील.

१४) राज्य शासनाच्या व इतर आर्थिक स्त्रोतातून महावितरण कंपनीमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व भौतिक व आर्थिक अहवाल वेळोवेळी सादर करेल.

१५) योजनेच्या आर्थिक भारात कोणतीही वाढ न करता लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सौर कृषीपंपासोबत दोन एलईडी डी.सी. बल्ब व एक मोबाईल चार्जिंग सॉकेट देण्यात येईल. याची निवड व कार्यपध्दती वेगळयाने महावितरण कंपनीद्वारे निश्चित करण्यात येईल.

१६) सदर योजना महावितरण कंपनीकडून राबविण्यात येत असल्याने महावितरण कंपनी, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, महसूल विभाग, कृषी विभाग, आदिवासी विकास विभाग इत्यादी विभागांची जबाबदारी व सहकार्य खालीलप्रमाणे राहिलः-

| **अ.क्र.** | **विभागाचे नाव** | **जबाबदारी** | **आवश्यक सहकार्य** |
|---|---|---|---|
| १. | महावितरण | योजनेतील मंजूर निकषांनुसार योजनेची अंमलबजावणी करणे, सर्व कार्यालये/ विभागांसमवेत समन्वय राखणे व योजना विहित मुदतीमध्ये राबवून पूर्ण करणे. तसेच सौर कृषीपंपाची निविदा आदर्श निविदा पत्रिकेचा अवलंब करून काढण्यात यावी. | आवश्यकतेनुसार इतर विभागांशी समन्वय साधून सहकार्य करणे. |
| २. | महावितरण कंपनी | सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांकडे पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी नसल्याबाबतचे प्रमाणित करणे. | |
| ३. | महसूल विभाग | लाभार्थ्यांकडे शेतजमीन नोंदीचे व पीक प्रकाराची पडताळणी करून प्रमाणित करणे. | महावितरण अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार सहकार्य करणे. |
| ४. | कृषि विभाग | लाभार्थ्यांकडील शेतजमीन नोंदीचे व पीक प्रकारची पडताळणी करण्यास मदत करणे. | महावितरण अधिकाऱ्यांना व महसूल अधिकाऱ्यांना आवश्यतेनुसार सहकार्य करणे. |
| ५. | आदिवासी विकास विभाग | अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची आवश्यकतेनुसार पडताळणी करून अहवाल देणे. | अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्यास मदत करणे. |
| ६. | सामाजिक न्याय विभाग | अनुसुचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची आवश्यतेनुसार पडताळणी करून अहवाल देणे. | अनुसुचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्यास मदत करणे. |

**१०.** सदर योजनेतील सौर कृषीपंपाद्वारे झालेला वीज वापर हा अपारंपारिक ऊर्जा खरेदी बंधनासाठी (RPO) महावितरण कंपनीस ग्राह्य धरता येईल.

**११.** या शासन निर्णयाद्वारे सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**१२.** या योजनेवरील खर्च संबंधित विभागांच्या या योजनेसाठीच्या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येईल.

**१३.** सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ३९८/१४६१, दिनांक ०८.०८.२०१९, वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक १८३/२०१९ दिनांक ११.०९.२०१९, सामाजिक न्याय विभाग अनौ. संदर्भ क्र. १०७ UOR, विघयो, दि. २३.०८.२०१९, आदिवासी विकास विभाग अनौ. संदर्भ क्र. २२६ का-६, दि. १६.०८.२०१९, कृषि विभाग अनौ. संदर्भ क्र. १/१४.०८.२०१९ व महसूल विभाग अनौ. संदर्भ क्र. ४५/२०१९/ज-१अ, दिनांक २२.०८.२०१९ अन्वये त्यांनी दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**१४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०९१११३३१२७६९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.09.11 15:46:27 +05'30'

**( ना. रा. ढाणे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई,
४) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधान भवन मुंबई,
५) सर्व विधानमंडळ सदस्य,विधान भवन, मुंबई,
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक,सर्व मंत्रालयीन विभाग,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१६) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या.,मुंबई,
१८) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१९) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२०) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२१) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
२२) उप सचिव/ ऊर्जा-३, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३) ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२४) मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) निवड नस्ती,ऊर्जा-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.